02 JUL 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के यांचे 'लास्ट लेक्चर'

## प्राध्यापक म्हणून संख्याशास्त्र अधिविभागातून सेवानिवृत्ती

प्रतिनिधी
कोल्हापूर


शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू तथा संख्याशास्त्र अधिविभागाचे प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्यांच्या शिक्षक म्हणून अखेरच्या दिवशी विद्यार्थ्यांसमोर लेक्चर देऊन अधिविभागाचा निरोप घेतला. वयोमानानुसार डॉ. शिर्के सोमवारी संख्याशास्त्र अधिविभागातून शिक्षक म्हणून सेवानिवृत्त झाले.

सध्याचा काळ स्मार्ट क्लासरुम शिक्षणाचा असला तरी सच्चा हाडाच्या शिक्षकासाठी मात्र खडू, फळा आणि डस्टर या साधनांचेच आकर्षण असते. साधारण ४० वर्षांपूर्वी जून १९८५ मध्ये डॉ. शिर्के हे विद्यार्थी म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागात दाखल झाले. तेथपासून ते आजतागायत त्यांची संपूर्ण कारकीर्द शिवाजी विद्यापीठातच घडली, साकार झाली. विद्यार्थीदशेत असतानाच डॉ. शिर्के यांनी खडू, फळा आणि डस्टरधारी शिक्षक होण्याचे स्वप्न पाहिले आणि ते पूर्णही केले. शिक्षकापासून ते अधिविभाग प्रमुख पदापर्यंत आणि प्रशासनातील कुलसचिव पदापासून ते कुलगुरू पदापर्यंत त्यांनी सर्व पदे यशस्वीरित्या भूषविली.

शिक्षक म्हणून आपल्या अखेरच्या दिवशीही आपण विद्यार्थ्यांसमोर खडू, फळ्यावर लेक्चर घ्यावयाचे, अशी सुप्त इच्छा डॉ. शिर्के यांच्या मनी होती. ती त्यांनी त्यांच्या शिक्षक पदाच्या अखेरच्या दिवशी पूर्ण केली. या व्याख्यानासाठी ते नेहमीप्रमाणे अर्धा तास आधीच संख्याशास्त्र अधिविभागात उपस्थित झाले होते.

डॉ. शिर्के यांनी अमेरिकन स्टॅटिस्टिकल असोसिएशनच्या 'दि अमेरिकन स्टॅटिस्टिशियन' या मान्यताप्राप्त शोधपत्रिकेमध्ये १९९१ साली प्रसिद्ध झालेल्या एका शोधनिबंधातील 'आयलस कॉन्स्टंट' (e) संदर्भातील संख्याशास्त्रीय सिद्धांत, संकल्पना विद्यार्थ्यांना शिकवल्या. विशेष म्हणजे, अधिविभागात स्मार्ट क्लासरुम आणि स्मार्ट बोर्ड असतानाही त्यांनी हा विषय खडू आणि फळा अशा पारंपरिक पद्धतीने शिकविण्याचा आनंद घेतला.

विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन प्राध्यापक शिर्के यांनी आपल्या अधिविभागातील शिक्षक म्हणून अखेरच्या व्याख्यानाचा समारोप केला. कोणताही औपचारिक निरोप नाही, समारंभ नाही, पुष्पगुच्छांची देवाणघेवाण नाही, झाली ती केवळ विचारांची देवाणघेवाण. एक शिक्षक म्हणून आपले कर्तव्य बजावत असताना किती निस्वार्थ भावनेने निवृत्तीकडे सरकता येते, याचा वस्तुपाठच जणू डॉ. शिर्के यांनी या निमित्ताने घालून दिला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागात शिक्षक म्हणून अखेरचे लेक्चर घेताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात वसंतराव नाईक जयंती

कोल्हापूर, ता. १ : माजी मुख्यमंत्री, राज्याच्या कृषिक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी झाली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. रामचंद्र पवार, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे, सुरेश बंडगर, विद्यार्थी विकास विभागाच्या सुरेखा अडके, अनिल साळोखे आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात वसंतराव नाईक जयंती

**कोल्हापूर :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, राज्याच्या कृषीक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे, सुरेश बंडगर, विद्यार्थी विकास विभागाच्या सुरेखा अडके, अनिल साळोखे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

पुढारी

## शिवाजी विद्यापीठ

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, राज्याच्या कृषिक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे, सुरेश बंडगर, विद्यार्थी विकास विभागाच्या सुरेखा अडके, अनिल साळोखे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठात वसंतराव नाईक जयंती उत्साहात

**कोल्हापूर :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, कृषिक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती मंगळवारी शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे, सुरेश बंडगर, विद्यार्थी विकास विभागाच्या सुरेखा अडके, अनिल साळोखे उपस्थित होते.

02 JUL 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘एआय’, डेटा सायन्सचे विद्यार्थ्यांना धडे

## अद्ययावत अभ्यासक्रमांची सुरुवात; कौशल्य, तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण

संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : बदलत्या तंत्रज्ञानावर आधारित पुणे, मुंबईतील शैक्षणिक संस्थांच्या धर्तीवर कोल्हापुरातील विद्यार्थ्यांना नव्या अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्याची सुविधा येथील महाविद्यालयांनी उपलब्ध करून दिली आहे. त्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, फॉरेन्सिक सायन्स आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

कोल्हापूरच्या शैक्षणिक क्षेत्रात १५ वर्षांपर्यंत कला, वाणिज्य, विज्ञान अशा ठराविक विद्याशाखांचे शिक्षण देण्याकडे महाविद्यालयांचा अधिकत्तर कल होता. मात्र, विविध क्षेत्रांत तंत्रज्ञानातील बदल आणि वाढत्या स्पर्धेमुळे नव्या अभ्यासक्रमांना विद्यार्थी, पालकांकडून प्राधान्य देण्यात येऊ लागले.

**बदलती महाविद्यालये**
भाग-२

या अभ्यासक्रमांना प्रवेशित होण्याकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढला. त्यातील काहींनी अशा अभ्यासक्रमांच्या शिक्षणासाठी मुंबई, पुणे आदी शहरांतील महाविद्यालय, शैक्षणिक संस्थांत प्रवेशाचा पर्याय निवडला. त्यावर कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाने नवे अभ्यासक्रम सुरू करण्याच्या दिशेने पावले उचलली.

विद्यापीठाचे निर्देश आणि उद्योग-व्यवसाय क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाला पूरक ठरणाऱ्या अभ्यासक्रमांची कोल्हापुरातील महाविद्यालयांतील सुरुवात केली. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, रिन्यूएबल एनर्जी मॅनेजमेंट, फिनटेक, डिजिटल मार्केटिंग, इव्हेंट मॅनेजमेंट, उद्योजकता विकास आदी विविध विषयांच्या शिक्षणाचे धडे विद्यार्थ्यांना या महाविद्यालयांतून मिळत आहेत. पारंपरिक अभ्यासक्रमांना त्यांच्या रूपाने चांगला पर्याय उपलब्ध झाला आहे. कौशल्य आणि तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण देत विद्यार्थी घडविण्याचे काम या महाविद्यालयांच्या माध्यमातून होत आहे.

### मान्यता मिळालेले नवीन अभ्यासक्रम

राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने कायम विनाअनुदानित तत्त्वावर कोल्हापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांना नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता दिली आहे. बी. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स (शिव-शाहू महाविद्यालय सरूड), मास्टर ऑफ रूरल स्टडीज, मास्टर ऑफ करेक्शनल ॲडमिनिस्ट्रेशन, एम. एस्सी. जीओ इन्फॉमेटिक्स (विवेकानंद कॉलेज), बी. कॉम.आयटी, एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, बी. एस्सी. बायो इन्फॉमेटिक्स, कॉम्प्युटर सायन्स (देवचंद कॉलेज अर्जुननगर), एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स (दूधसाखर महाविद्यालय, बिद्री), बी. एस्सी. डेटा सायन्स (शाहू कॉलेज) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

### अभ्यासक्रमांची संख्या वाढली

शिवाजी विद्यापीठातील अभ्यासक्रमांची संख्या दोन वर्षांपूर्वी ४२ होती. गेल्यावर्षी नव्या सहा अभ्यासक्रमांची भर पडल्याने ही संख्या ४८ वर गेली आहे. त्यात पदवीच्या अभ्यासक्रमांची संख्या ४२ आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची संख्या सहा झाली आहे.

### विद्यापीठ महाविद्यालयांची तपासणी

कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचा विद्याविषयक आणि प्रशासनाचा दर्जा तपासणीचे काम विद्यापीठाकडून सुरू आहे. त्यात सात निकष आणि गुणांकनावर आधारित तपासणी केली जाते. त्याने निश्चितपणे गुणवत्ता वाढीला बळ मिळणार आहे. आतापर्यंत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकूण ५३ महाविद्यालयांची तपासणी झाली आहे. त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील २५ महाविद्यालयांचा समावेश असल्याचे विद्यापीठातील संलग्नता (टी-२) विभागाचे उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव यांनी सांगितले.

### जिल्ह्यातील महाविद्यालये

- एकूण महाविद्यालये-१२९
- अनुदानित-५४
- शासकीय-२
- विनाअनुदानित-७३
- स्वायत्त-९
- महिला-१०
- अल्पसंख्याक-५